सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# संरक्षण सेवेमध्ये अधिकारी होण्याची महाराष्ट्रातील युवकांना सुवर्ण संधी

महाराष्ट्र शासन

## Gate way of Defence Career

# SPI

१. <u>सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,(एस.पी.आय.) औरंगाबाद</u> :- संरक्षण सेवेमध्ये अधिकारी म्हणून महाराष्ट्रातील युवकांना जास्तीतजास्त संख्येने जाता यावे आणि त्यासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एन.डी.ए.) स्पर्धात्मक परिक्षेस बसण्याची तयारी करवून घेण्याच्या दृष्टीने पात्र उमेदवारांसाठी, औरंगाबाद येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची (एस.पी.आय.) स्थापना महाराष्ट्र शासनाने केलेली आहे.

२. <u>पात्रता</u> :- अविवाहीत (मुलगा) उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असला पाहिजे(Domicile of Maharashtra Certificate) आणि ज्याची जन्म तारीख ०२ सप्टेंबर २००० ते ३१ डिसेंबर २००२ च्या दरम्यान आहे, असे उमेदवार पात्र आहेत. तसेच तो मार्च/एप्रिल २०१७ मध्ये होणा-या माध्यमिक शालांत (एस.एस.सी.) परीक्षेला बसणारा असावा.

३. <u>शारिरीक पात्रता</u>:- उमेदवाराची किमान शारिरीक पात्रता (अ) उंची-१५७ से.मी. (ब) वजन-४३ कि.ग्रॅ. (क) छाती न फुगवता-७४ से.मी. फुगवून-७९ से.मी. (ड) दृष्टी-चष्मा लावून जास्तीत-जास्त ६/९, तसेच रंगांधळेपणा नसावा. लाल व हिरवा रंग ओळखता आला पाहिजे.

४. <u>लेखी परीक्षा आणि मुलाखत</u>: पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा एप्रिल २०१७ मध्ये कोल्हापूर, पुणे, नागपूर,आणि औरंगाबाद केंद्रांवर घेतली जाईल. लेखी परीक्षा फक्त इंग्रजी माध्यमातूनच घेतली जाते. लेखी परीक्षा ही एकूण १५० मार्कांची घेतली जाईल, त्यामध्ये एक पेपर गणित (Math) व दुसरा पेपर General Ability Test चा असेल. पेपर प्रत्येकी ७५ मार्काचे असतील. लेखी परीक्षा ही इयत्ता १० वीच्या स्टेटबोर्ड व सी.बी.एस.ई. च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. लेखी परीक्षा व तोंडी मुलाखतीच्या सविस्तर माहितीसाठी संस्थेचे संकेतस्थळ (Website) www.spiaurangabad.com पहावे.

५. <u>प्रवेश अर्ज करण्याची पध्दत</u> :

<u>(अ) ऑनलाईन पध्दत</u> :- ऑनलाईन अर्ज <u>www.spiaurangbad.com</u> या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेला आहे. तरी इच्छुक उमेदवाराने सदरहू संकेत स्थळावर जाऊन सूचने नूसार अर्ज भरावे व परीक्षा क्षुल्क ऑनलाईनच क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकींग व्दारे भरावे.

<u>(ब) ऑफलाईन पध्दत</u> :- इच्छुक उमेदवारांनी संस्थेचा प्रवेश अर्ज व बँक चलान संस्थेच्या वेबसाईट वरुन डाऊनलोड करून घ्यावे. (२) संस्थेचा प्रवेश अर्ज संपूर्णरित्या भरून रू.४५० परीक्षा शुल्क व रू.३५/-बँक शुल्क असे बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेत चलनाव्दारे भरावेत. चलान तीन प्रतीत भरावे. भरलेल्या चलनाची मुळ प्रत आणि भरलेला प्रवेश अर्ज संस्थेच्या पत्त्यावर कुरीयर अथवा स्पीड पोस्टाने पाठवावा. (३) अथवा रू.४५०/-चा फक्त राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) Director, SPI, Aurangabad Payable at Aurangabad या नावाने काढून भरलेल्या प्रवेश अर्जासह संस्थेच्या पत्त्यावर पाठवावा. (४) प्रवेश अर्जासोबत चेक,मनिऑर्डर व पोस्टल ऑर्डर्स स्विकारल्या जाणार नाहीत.

६. <u>उमेदवाराचा पत्ता</u> : प्रवेश अर्जावर तसेच लिफाफ्यावर उमेदवाराने नाव,पत्ता, दुरध्वनी क्रमांक आणि e-mail Id लिहीणे आवश्यक आहे. नसल्यास प्रवेश अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

७. <u>प्रवेश अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख</u> : अर्ज दिनांक १० फेब्रुवारी २०१७ पर्यंत पोहोचले पाहिजेत. त्यानंतर आलेल्या तसेच अपूर्ण भरलेल्या प्रवेश अर्जाचा विचार केला जाणार नाही. या बाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. <u>हॉल तिकीट</u> : लेखी परीक्षेचे हॉल तिकीट दिनांक २५ मार्च २०१७ पर्यंत प्राप्त न झाल्यास संपर्क साधावा.टपालाने/कुरीयरने पाठविलेले अर्ज संस्थेस प्राप्त न झाल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

९. <u>अटी व शर्ती</u> : प्रवेश अर्ज संस्थेच्या अटी व शर्ती नुसार भरलेला नसल्यास अर्जासोबत भरलेली प्रवेश अर्जाची रक्कम परत मिळणार नाही.

१०. *<u>टीप : अर्ज करण्यापूर्वी संस्थेच्या संकेत स्थळावरून सर्व सविस्तर माहिती करून घ्यावी.</u>*

**SERVICES PREPARATORY INSTITUTE,**
**N-12 SECTOR,CIDCO,AURANGABAD**
सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद
(एस.पी.आय.दुरध्वनी ९२७२२११३७०/०२४०-२३८१३७०)
ईमेल :sanchalakspi@gmail.com
वेबसाईट : www.spiaurangabad.com

स्वाक्षरीत /-
(उदय एस पोळ)
ले.कर्नल (निवृत्त)
संचालक